## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-**

१) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ यांचेकडून दि.२०/०१/२०१२ रोजी व त्यासोबत स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामिण यांचे दिनांक ०६/०१/२०१२ रोजीच्या पत्रासोबत प्राप्त झालेले कागदपत्रे

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.०२/२०१२/जा.३६, दिनांक २१/०१/२०१२.

३) या कार्यालयाची "अंतरिम आदेश" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.०२/२०१२/जा.३७ दिनांक २१/०१/२०१२.

४) उपनियंत्रक शिधावाटप, ड परिमंडळ यांचा दिनांक १४/०३/२०१२ रोजी प्राप्त अहवाल.

५) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामिण यांचे दिनांक २२/०३/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

६) उप संचालक (गो), नागरी पुरवठा, मुंबई यांचा दि.०२/०४/२०१२ रोजीचा प्राप्त अहवाल.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.०२/२०१२/जा. २७६
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई २०.
दिनांक :- 30/०४/२०१२.

## आदेश

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक ०२/०१/२०१२ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामिण यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, मुंबई बोरीवली येथून एक ट्रक क्र. एमएच-०४-डीके-७३१७ यामध्ये शासन नियंत्रित दराचा गहू काळ्याबाजाराने विक्री करण्याच्या उद्देशाने भरुन त्याची अवैधरित्या वाहतूक होत असून सदर ट्रक मुंबई अहमदाबाद हायवे रोडने वसई बाजुकडे जात आहे. सदर ट्रक अडवून तो ताब्यात घेण्यासाठी पोलिस पथकाने दोन पंचांसमवेत खाजगी वाहनाने मुंबई अहमदाबाद हायवे रोडवरील वर्सोवा नाका येथे जाऊन सापळा रचला असता, मिळालेल्या बातमीप्रमाणे २०.३० वाजताच्या सुमारास ट्रक क्र. एमएच-०४-डीके-७३१७ हा मुंबई बाजूकडून आला. तो वसई बाजूस चालला असताना पोलिस पथकाने तो थांबविला. त्यामध्ये ट्रक ड्रायव्हर व त्याशेजारी २ इसम बसलेले होते व ट्रकचे पाठीमागे २ इसम बसलेले होते. सदर ट्रक ड्रायव्हर यास पोलिसांनी पथकातील सदस्यांची व

पंचांची ओळख करुन दिली व त्यास त्याचे नांव गाव विचारता त्याने त्याचे नांव मोहंमद समीम मोहंमद सलीम सहा असे सांगितले. त्यानंतर शेजारी बसलेल्या इतर २ इसमांना त्यांचे नांव गाव विचारता त्यांनी त्यांची नांवे राध्येशाम दिलीपकुमार यादव व अर्जुनकुमार ब्रिजलाल सरोज अशी सांगितली. इतक्यात ट्रकच्या पाठीमागे बसलेले २ इसम अंधाराचा फायदा घेऊन पळून गेले. ड्रायव्हर व्यतिरिक्त असलेले २ इसम व पळून गेलेले २ इसम हमाल असल्याचे व त्यांची नावे पप्पु व सुदन असल्याचे ट्रक ड्रायव्हर याने सांगितले. सदर ट्रक ड्रायव्हर याचे कब्जात असलेल्या ट्रकची पहाणी करता, सदर ट्रकमध्ये भारतीय खाद्य निगम असा लिहिलेल्या ५० किलो वजनाच्या एकूण २०० गोणी आढळून आल्या. त्याचेकडे चौकशी करता त्याने सदर गहू हा सुरेंद्रकुमार सुभेदार सिंग यांचे सांगण्यावरुन सदर ट्रकमध्ये भरलेला असून तो वसई बाजूकडे वाहून नेत असल्याचे सांगितले. सदर गहू हा शासन नियंत्रित दराचा गहू असल्याने त्याचेकडे सदर गव्हाचे वहातुकीबाबत शिधावाटप यंत्रणेचा कोणता परवाना अथवा मालाचे बिल आहे काय; याबाबत विचारपुस करता त्याने त्याचेकडे कोणताही परवाना अथवा बिल नसल्याचे सांगितले. ट्रक ड्रायव्हर याचेकडे सुरेंद्रकुमार सिंग याचे बाबत विचारपुस करता सुरेंद्रकुमार सिंग हे त्याचेकडे असलेल्या स्विफ्ट गाडीमधून सदर ट्रकच्या मागे येत आहेत, असे सांगितले. म्हणून पथक वाट पाहत असतानाच एक स्विफ्ट कार क्र. एमएच-०२-बीवाय-३२७७ ही आली. त्यामधून २ इसम उतरले. त्यातील एका इसमाकडे बोट दाखवून तो सुरेंद्रकुमार सिंग असल्याचे ट्रक ड्रायव्हर याने सांगितले. तेव्हा पोलिसांनी सुरेंद्रकुमार सिंग यांचेकडे चौकशी करता त्याने त्याचे नांव सुरेंद्रकुमार सुभेदार सिंग उर्फ बाबा, ट्रान्सपोर्टचा व्यवसाय असल्याचे सांगून सोबत असलेला इसम हा नामे दिलीप शिवलाल ठक्कर असे असल्याचे सांगितले व सदर गहू हा त्यांनी बोरीवली येथून सदर ट्रकमध्ये भरलेला असून तो दिलीप ठक्कर याने विकत घेतलेला असल्याचे सांगितले. त्यांचेकडे सदर गहू खरेदीबाबत काही कागदपत्रे आहेत अगर कसे, याबाबत विचारपुस करता त्यांनी ट्रकमध्ये बसलेल्या पप्पु व सुदन यांचेकडे सदर मालाची बिल्टी असल्याचे सांगितले. म्हणून ट्रक ड्रायव्हर याचेकडे विचारपुस करता सदरचे इसम हेच ट्रकमध्ये मागे बसलेले होते व तेच इसम पळून गेले असल्याचे त्याने सांगितले. वरील सर्व इसमांना ताब्यात घेण्यात आले. तसेच सदर माल भरलेला ट्रक व इसम सुरेंद्रकुमार सिंग व दिलीप ठक्कर यांनी सदर ट्रकचा पाठलाग करण्यासाठी वापरलेली स्विफ्ट कार अशी वाहने ताब्यात घेण्यात आली.

तद्नंतर सदर इसमांना काशिमिरा येथील युनिट कार्यालयात आणण्यात येऊन शिधावाटप अधिकारी / निरिक्षक यांचेशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्यांचेशी संपर्क होऊ शकला नसल्याने तशी स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामिण कार्यालयातील ठाणे दैनंदिनीत नोंद घेण्यात आली. त्यानंतर दिनांक ०३/०१/२०१२ रोजी सकाळी शिधावाटप कार्यालय भाईंदर येथे संपर्क साधून त्यांना पत्र देऊन सदर बाबत माहिती कळविण्यात आली



000

असता, शिधावाटप अधिकारी श्री. प्रकाश वामन पाटील व शिधावाटप निरिक्षक श्री. बाबुलाल रामदास ठाकूर असे अधिकारी काशिमिरा युनिट कार्यालयात आले. तदनंतर पंचासमक्ष सदर शिधावाटप अधिकारी व निरिक्षक यांची ओळख करुन देण्यात आली व त्यांना सदरचा जप्त मुद्देमाल दाखविण्यात येऊन याबाबत विचारपुस करण्यात आली असता, त्यांनी सदर ट्रकमध्ये असलेला माल हा शिधावाटप यंत्रणेच्या शासन नियंत्रित दराच्या गहू असल्याचे सांगितल्याने तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला.

त्यानंतर सदर गहू हा भारतीय खाद्य निगम, राजेंद्र नगर बोरीवली येथून भरला असल्याची माहिती पकडलेल्या इसमांनी दिल्याने पोलिस पथक भारतीय खाद्य निगम बोरीवली येथे गेले असता त्यांना पो.उ.नि. श्री. लागी सो., यांनी रिपोर्ट देऊन माहिती मागितली असता त्यांचेकडून माहिती मिळाली की, सदर भारतीय खाद्य निगम लेबल असलेल्या गव्हाच्या गोणी या शिधावाटप यंत्रणेच्या असून त्या शासन नियंत्रित दराच्या गव्हाच्या आहेत व त्या गोणी मुंबई मधील शिधावाटप दुकान क्र. २९ डी २०, २९ डी २१, २९ डी १८, २९ डी १७ या दुकानांना वितरीत करण्यासाठी सदर ट्रक क्र. एमएच-०४-डीके-७३१७ मध्ये दिनांक ०२/०१/२०१२ रोजी सायंकाळी १७.१६ वाजता भरण्यात आलेला असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

अशाप्रकारे संबंधितानी संगणमत करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकेवर अनुदानित दराने वितरीत होणारा गहू बोरीवली येथल भारतीय खाद्य निगम याच्या भंडारातून भरुन तो मुंबई मधील शिधावाटप दुकानामध्ये गरजू व पात्र शिधापत्रिकाधारकांना वितरीत न करता त्यांच्या स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी सदर गव्हाची काळ्या बाजाराने विक्री करण्यासाठी बोरीवली येथून वसई बाजूकडे नेत असताना मुंबई अहमदाबाद हायवे रोडवरील वर्सोवा ब्रिजच्या नाक्यावर घेऊन जात असल्याचे सकृतदर्शनी निष्पन्न झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द (१) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ व ९ (२) दि बॉम्बे रेशनिंग एरिया शेडयुल कमोडिटीज (रेग्युलेशन ऑफ डिस्ट्रिब्युशन) ऑर्डर, १९८६ चे कलम ३ व ४ तसेच (३) दि महाराष्ट्र फुड ग्रेन्स रेशनिंग (सेकंड) ऑर्डर १९६६ चे कलम ३, ३(अ), ४, ५ व ६ चा भंग केल्यावरुन संबंधितांविरुध्द काशिमिरा पोलिस ठाणे, जिल्हा ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. II २/२०१२ दि.०३/०१/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | एक टाटा कंपनीचा एमएच-०४-डीके-७३१७ या क्रमांकाचा १६१३ मॉडेलचा लाल सफेद रंगाचा ट्रक | १ नग | १०,००,०००/- |
| २ | शिधावाटप यंत्रणेचा शासन नियंत्रित दराचा गहू एकूण २०० गोणी प्रत्येक गोणी ५० किलो वजनाची | १०००० किलो | २,००,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | एक मारुती सुझुकी कंपनीची स्विफ्ट मॉडेलची पांढऱ्या रंगाची कार क्र. एमएच-०२-बीवाय-३२७७ | १ नग | ४,००,०००/- |
| | | एकूण | १६,००,०००/- |

सबब, उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामिण यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ०८/०२/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

दिनांक ०८/०२/२०१२ रोजीच्या सुनावणीस सुरेंद्रकुमार सुभेदार सिंग उर्फ बाबा हे उपस्थित राहिले व ट्रक क्र. एमएच-०४-डीके-७३१७ तसेच स्विफ्ट कार क्र. एमएच-०२-बीवाय-३२७७ चे मालक असल्याचे सांगितले तसेच सदर सुनावणीस ट्रक क्र. एमएच-०४-डीके-७३१७ चे चालक मोहंमद समीम मोहंमद सलीम सहा व ट्रक क्र. एमएच-०४-डीके-७३१७ चे हमाल अर्जुनकुमार ब्रिजलाल सरोज हे उपस्थित राहिले. तथापी, सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत. सदर सुनावणीस उपस्थित इसमांनी त्यांना काहीही सांगावयाचे नसल्याचे सांगून त्यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर केले नाही.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयासाठी राखून ठेवण्यात आले.

**युक्तिवाद :-**

दिनांक ०८/०२/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित ट्रक क्र. एमएच-०४-डीके-७३१७ तसेच स्विफ्ट कार क्र. एमएच-०२-बीवाय-३२७७ चे मालक सुरेंद्रकुमार सुभेदार सिंग उर्फ बाबा, ट्रक क्र. एमएच-०४-डीके-७३१७ चे चालक मोहंमद समीम मोहंमद सलीम सहा व ट्रक क्र. एमएच-०४-डीके-७३१७ चे हमाल अर्जुनकुमार ब्रिजलाल सरोज यांनी सुनावणी दरम्यान त्यांना काहीही सांगावयाचे नसल्याचे सांगितले आहे.

उपनियंत्रक शिधावाटप, ड परिमंडळ, अंधेरी यांचे दिनांक १४/०३/२०१२ रोजी प्राप्त अहवालात, वितरण आदेश क्र. ३६३८० दिनांक ०२/०१/२०१२ नुसार निर्देशन पत्र भाग -१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मे. सम्राट कन्झुमर्स को.ऑ. सोसा. लि. या संस्थने दिनांक ०२/०१/२०१२ रोजी गाडी क्र. एमएच-०४-डीके-७३१७ अन्वये अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २९ ड/२०, २१, १७ व १८ या दुकानांकरिता उचललेला गहू सदर दुकानांना दिनांक ०२/०१/२०१२ रोजी वितरीत न झाल्याचे दिसून येते, असे नमूद आहे.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामिण यांचे दिनांक २२/०३/२०१२ रोजीचे टपालामार्फत प्राप्त लेखी अभिवेदनात, अंतरीम आदेशामध्ये नमूद केल्याप्रमाणे शिधावाटप अधिकारी यांनी शासनजमा करण्यात आलेल्या ५० किलो वजनाच्या २०० गोण्यांमधील १०,००० किलो गहू उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांच्या कार्यक्षेत्रातील अधिकृत शिधावाटप दुकानदार यांना नियंत्रित दराने वितरीत करुन आलेला रकमेचा डी.डी. हा वित्तीय सल्लागार, उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांच्या कार्यालयाचे वैयक्तिक ठेव लेख्यात, ४४०८ या लेखा शिर्षात जमा करण्यात आला असून सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-०४-डीके-७३१७ हा काशिमिरा पोलिस ठाणेच्या आवारात जमा असून याबाबत पुढील आदेश होणेस विनंती केली आहे.

उप संचालक (गो), नागरी पुरवठा, मुंबई यांचे दिनांक ०२/०४/२०१२ रोजीच्या प्राप्त अहवालात, उपनियंत्रक शिधावाटप, ड परिमंडळाने वितरण आदेश क्र. ३६३८० दिनांक ०२/०१/२०१२ हा सम्राट कंन्झ्युमर्स कॉ. ऑप. सोसा. या संघटीत संस्थेकरिता ४७५ क्विंटल गैरलाभार्थी गव्हाकरिता निर्गमित केलेला होता. त्यापैकी नमूद गुन्ह्यातील गाडी क्र. एमएच-०४-डीके-७३१७ मधून वितरण आदेश क्र. ३६३८० दिनांक ०२/०१/२०१२ च्या वितरण आदेशान्वये अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २९ ड/२०, २१, १८ व १७ या दुकानांकरिता मालाची उचल केल्याचे नमूद केले आहे.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक ०२/०१/२०१२ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामिण यांना मुंबई बोरीवली येथून एक ट्रक क्र. एमएच-०४-डीके-७३१७ यामध्ये शासन नियंत्रित दराचा गहू काळ्याबाजाराने विक्री करण्याच्या उद्देशाने भरुन त्याची अवैधरित्या वाहतूक होत असून सदर ट्रक मुंबई अहमदाबाद हायवे रोडने वसई बाजुकडे जात असल्याची मिळालेल्या गुप्त बातमीनुसार सदर ट्रक अडवून तो ताब्यात घेण्यासाठी पोलिस पथकाने दोन पंचांसमवेत मुंबई अहमदाबाद हायवे रोडवरील वर्सोवा नाका येथे जाऊन सापळा रचून २०.३० वाजताच्या सुमारास ट्रक क्र. एमएच-०४-डीके-७३१७ हा मुंबई बाजूकडून वसई बाजूस चालला असताना पोलिस पथकाने थांबवून त्यामधील ट्रक ड्रायव्हर नामे मोहंमद समीम मोहंमद सलीम सहा व त्याशेजारी बसलेले २ इसम नामे राध्येशाम दिलीपकुमार यादव व अर्जुनकुमार ब्रिजलाल सरोज व ट्रकचे पाठीमागे २ इसम बसलेले होते. इतक्यात ट्रकच्या

पाठीमागे बसलेले २ इसम अंधाराचा फायदा घेऊन पळून गेले. त्यांची नावे पप्पु व सुदन असल्याचे ट्रक ड्रायव्हर याने सांगितले. सदर ट्रक ड्रायव्हर याचे कब्जात असलेल्या ट्रकची पहाणी करता, सदर ट्रकमध्ये भारतीय खाद्य निगम असा लिहिलेल्या ५० किलो वजनाच्या एकूण २०० गोणी आढळून आल्या. त्याचेकडे चौकशी करता त्याने सदर गहू हा सुरेंद्रकुमार सुभेदार सिंग यांचे सांगण्यावरुन सदर ट्रकमध्ये भरलेला असून तो वसई बाजूकडे वाहून नेत असल्याचे सांगितले. ट्रक ड्रायव्हर याने सुरेंद्रकुमार सिंग हे त्याचेकडे असलेल्या स्विफ्ट गाडीमधून सदर ट्रकच्या मागे येत आहेत, असे सांगितले. तद्‌नंतर एक स्विफ्ट कार क्र. एमएच-०२-बीवाय-३२७७ मधून २ इसम उतरले. त्यातील एका इसमाकडे बोट दाखवून तो सुरेंद्रकुमार सिंग असल्याचे सांगितले असता, पोलिसांनी सुरेंद्रकुमार सिंग यांचेकडे चौकशी करता त्याने त्याचे नांव सुरेंद्रकुमार सुभेदार सिंग उर्फ बाबा यांनी त्यांचा ट्रान्सपोर्टचा व्यवसाय असल्याचे सांगून सोबत असलेला इसम हा नामे दिलीप शिवलाल ठक्कर याने सदर गहू हा त्यांनी बोरीवली येथून सदर ट्रकमध्ये भरलेला असून तो दिलीप ठक्कर याने विकत घेतलेला असल्याचे सांगितले. त्यांचेकडे सदर गहू खरेदीबाबत कागदपत्रांची विचारणा केली असता, त्यांनी ट्रकमध्ये बसलेल्या पप्पु व सुदन यांचेकडे सदर मालाची बिल्टी असल्याचे सांगितले. वरील सर्व इसमांना ताब्यात घेण्यात येऊन सदर माल भरलेला ट्रक व इसम सुरेंद्रकुमार सिंग व दिलीप ठक्कर यांनी सदर ट्रकचा पाठलाग करण्यासाठी वापरलेली स्विफ्ट कार अशी वाहने ताब्यात घेण्यात आली. तद्‌नंतर दिनांक ०३/०१/२०१२ रोजी सकाळी शिधावाटप कार्यालय भाईंदर येथील शिधावाटप अधिकारी श्री. प्रकाश वामन पाटील व शिधावाटप निरिक्षक श्री. बाबुलाल रामदास ठाकूर यांनी पंचांसमक्ष सदर ट्रकमध्ये असलेला माल हा शिधावाटप यंत्रणेचा शासन नियंत्रित दराचा गहू असल्याचे सांगितल्याने तसा सविस्तर पंचनामा करुन सदर भारतीय खाद्य निगमचा लेबल असलेल्या गव्हाच्या गोणी या शिधावाटप यंत्रणेच्या असून त्या शिधावाटप दुकान क्र. २९ डी २०, २९ डी २१, २९ डी १८, २९ डी १७ या दुकानांना वितरीत करण्यासाठी सदर ट्रक क्र. एमएच-०४-डीके-७३१७ मध्ये दिनांक ०२/०१/२०१२ रोजी सायंकाळी १७.१६ वाजता भरण्यात आलेला असल्याची माहिती बोरीवली येथील शासकीय गोदामातून प्राप्त झाल्याने संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद करुन एक ट्रक, एक कार व ५० किलो वजनाच्या २०० गोण्यामधील (१०००० किलो) गहू असा एकूण १६,००,०००/- रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उप संचालक (गो), नागरी पुरवठा यांचे अहवालात, उपनियंत्रक शिधावाटप, ड परिमंडळ यांनी वितरण आदेश क्र. ३६३८० अन्वये दिनांक ०२/०१/२०१२ रोजी मे. सम्राट कंन्झ्युमर्स को. ऑप. सोसा. या संघटीत संस्थेकरिता ४७५ क्विंटल गैरलाभार्थी गव्हाकरिता निर्गमित केलेला असून त्यापैकी नमूद गुन्ह्यातील गाडी क्र. एमएच-०४-डीके-७३१७ मधून वितरण आदेश क्र. ३६३८० दिनांक ०२/०१/२०१२ च्या वितरण आदेशान्वये

अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २९ ड/२०, २१, १८ व १७ या दुकानाकरिता शासकीय गोदाम, बोरीवली येथून मालाची उचल केल्याचे नमूद असून उपनियंत्रक शिधावाटप ड परिमंडळ यांनी प्रस्तुत प्रकरणी केलेल्या चौकशी अहवालात, वितरण आदेश क्र. ३६३८० दिनांक ०२/०१/२०१२ नुसार निर्देशन पत्र भाग -१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मे. सम्राट कन्झुमर्स को.ऑ. सोसा. लि. या संस्थने दिनांक ०२/०१/२०१२ रोजी गाडी क्र. एमएच ०४ डीके ७३१७ अन्वये अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २९ ड/२०, २१, १७ व १८ या दुकानांकरिता उचललेला गहू सदर दुकानांना दिनांक ०२/०१/२०१२ रोजी वितरीत न केल्याचे नमूद आहे. तसेच घटनास्थळी ट्रक क्र. एमएच ०४ डीके ७३१७ चे ड्रायव्हर मोहमद समिम मोहम्मद सलिम सहा याने पोलिसांना दिलेल्या जबाबात, सदर ट्रकमधील गहू हा सुरेंद्रकुमार सुभेदार सिंग याच्या सांगण्यावरुन वसई बाजूकडे वाहून नेत असल्याचे सांगितले व सुरेंद्रकुमार सुभेदार सिंग याने सदर ट्रकमधील शासन नियंत्रित दराचा गहू हा बोरीवली येथील शासकीय गोदामातून भरलेला असून तो दिलीप शिवलाल ठक्कर याने विकत घेतला असल्याचे सांगितले आहे.

१२. सुनावणीस उपस्थित ट्रक क्र. एमएच ०४ डीके ७३१७ तसेच स्विफ्ट कार क्र. एमएच ०२ बीवाय ३२७७ चे मालक सुरेंद्रकुमार सुभेदार सिंग उर्फ बाबा, ट्रक क्र. एमएच ०४ डीके ७३१७ चे चालक मोहमद समीम मोहमद सलीम सहा व ट्रक क्र. एमएच ०४ डीके ७३१७ चे हमाल अर्जुनकुमार ब्रिजलाल सरोज यांनी सुनावणी दरम्यान त्यांना काहीही सांगावयाचे नसल्याचे सांगितले आहे. सदर सुनावणीस इतर आरोपी/अपचारी तसेच मे. सम्राट कन्झ्युमर्स को. ऑप. सोसा. या संस्थेच्या वतीनेही कोणीही उपस्थित राहिले नाहीत. जप्त मुद्देमालाचे मालक तसेच आरोपी/अपचारी यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता संधी देवून देखील त्यांनी सुनावणीस उपस्थित राहून आवश्यक पुरावादर्शक दस्ताऐवज सादर केले नाही. यावरुन आरोपी/अपचारी आणि जप्त मुद्देमालाचे मालक यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच जप्त मुद्देमाल परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्य नसल्याचे व नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येते.

अशाप्रकारे मे. सम्राट कंन्झ्युमर्स को. ऑप. सोसायटी या संस्थेस संलग्न असलेल्या ड - परिमंडळ कार्यक्षेत्रातील अधिकृत शिधावाटप दुकानदारांनी नोंदविलेल्या मागणीच्या अनुषंगाने सदर संस्थेने बोरीवली गोदामातून सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अनुदानीत गव्हाची उचल केली. तथापि, त्यांचे संबंधित अधिकृत शिधावाटप दुकानदारांना वितरण केलेले नाही. यामुळे मे. सम्राट कंन्झ्युमर्स को. ऑप. सोसायटी या संस्थेने उचल केलेल्या नियंत्रीत दराच्या गव्हाचा गैरमार्गाने साठा करुन काळा बाजार व नफेखोरी करण्याच्या उद्देशाने शासनाची दिशाभूल व फसवणूक करुन शिधापत्रिकाधारकांना धान्य मिळण्यापासून वंचित ठेवले असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

वस्तूत: दि महाराष्ट्र फुडग्रेन्स रेशनिंग (सेकण्ड) रेग्युलेशन, १९६६ चे कलम १८ (३) मधील (अे) मधील तरतूदीनुसार संलग्न संस्थेने त्यांना संलग्न असलेल्या अधिकृत शिधावाटप दुकानांनी मागणी केल्याप्रमाणे शासकिय गोदामातून उचल केलेले शिधाजिन्नस संबंधित अधिकृत शिधावाटप दुकानांना पोहोच करणे बंधनकारक आहे. तथापि, मे. सम्राट कंन्झ्युमर्स को. ऑप. सोसायटी यांनी दि. ०२/०१/२०१२ रोजी त्यांना संलग्न असलेल्या अधिकृत शिधावाटप दुकानांकरिता गव्हाची उचल करुन त्यांनी संबंधित दुकानांना उचल केल्याप्रमाणे व दुकानदारांच्या मागणी प्रमाणे गव्हाचा पुरवठा गुन्हा नोंदवेपर्यंत केलेला नाही. यावरुन मे. सम्राट कंन्झ्युमर्स को. ऑप. सोसायटी यांचा हेतू स्वच्छ नसल्याचे स्पष्ट होते. सबब, मे. सम्राट कंन्झ्युमर्स को. ऑप. सोसायटी यांनी उचल केलेला गव्हाचा साठा संबंधित अधिकृत शिधावाटप दुकानांना पोहोच न करता तो ट्रक ड्रायव्हर, क्लिनर, हमाल व सुरेंद्रकुमार सुभेदार सिंग उर्फ बाबा यांच्याशी संगणमत करुन परस्पर दिलीप शिवलाल ठक्कर नामे इसमास गैरमार्गाने विक्री केल्याचे निष्पन्न झाले आहे. सबब, जप्त गव्हाच्या साठ्यासंदर्भात पारित करण्यात आलेले "क्र.निशि/अमल/६ अ/ प्र.क्र.०२/२०१२/जा.३७, दिनांक २१/०१/२०१२" चे अंतरिम आदेश कायम करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तूत गुन्ह्यात, जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-०४-डीके-७३१७ तसेच स्विफ्ट कार क्र. एमएच-०२-बीवाय-३२७७ चे मालक म्हणून सुरेंद्रकुमार सुभेदार सिंग उर्फ बाबा हे सुनावणीस उपस्थित राहिले व त्यांनी सदरची दोन्ही वाहने त्यांच्या मालकीचे असल्याचे सांगितले. तथापी, वाहनांसंबधीचे प्रादेशिक परिवहन विभागामार्फत प्राप्त वाहनांचे नोंदणीकृत प्रमाणपत्र सादर केले नाही. अथवा सदरची वाहने परत मिळण्याबाबत तसे लेखी निवेदनही सादर केले नाही. घटनास्थळी ट्रक क्र. एमएच-०४-डीके-७३१७ मधून बोरीवली गोदाम येथून अधिकृत शिधावाटप दुकानांना वितरण करण्यासाठी भरण्यात आलेला गव्हाचा साठा मुंबई-अहमदाबाद हायवेवर वसईच्या दिशेने जात असताना पोलिसांनी रंगेहाथ पकडला आहे. तसेच स्विफ्ट कार क्र. एमएच-०२-बीवाय-३२७७ या वाहनातून सुरेंद्रकुमार सुभेदार सिंग उर्फ बाबा हे सदर ट्रकच्या मागे त्याच दिशेने जात असल्याचे आढळून आले व सदरचा शासन नियंत्रित दराचा गव्हाचा साठा मे. सम्राट कंन्झ्युमर्स को. ऑप. सोसायटी या संस्थेकडून गैरमार्गाने खरेदी करणारा इसम नामे दिलीप शिवलाल ठक्कर हा त्याच्या समवेत प्रवास करीत असल्याचे घटनास्थळी आढळून आले आहे. दोन्ही वाहनांचे मालक म्हणून दावा करणारे सुरेंद्रकुमार सुभेदार सिंग उर्फ बाबा यांनी त्यांच्या वाहनांचा अवैध वाहतुकीसाठी वापर केल्याचे निष्पन्न झाले आहे. यावरुन ट्रक क्र. एमएच-०४-डीके-७३१७ तसेच स्विफ्ट कार क्र. एमएच-०२-बीवाय-३२७७ या दोन्ही वाहनांच्या मालकाचा सदर गुन्हा नोंद प्रकरणी प्रत्यक्ष सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील

तरतुदीनुसार सदरचा जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-०४-डीके-७३१७ व स्विफ्ट कार क्र. एमएच-०२-बीवाय-३२७७ ही वाहने त्यांच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास वाहनांचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरची वाहने त्यांच्या मालकास परत करण्याच्या अथवा वाहनांचे मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास दोन्ही वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी दोन्ही वाहनांच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसानी खातरजमा करावी.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये काशिमिरा पोलिस ठाणे, जिल्हा ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. II २/२०१२ दि.०३/०१/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**आदेश :-**

१) या कार्यालयाचे दिनांक २१/०१/२०१२ रोजीचे अंतरिम आदेश या आदेशान्वये कायम करण्यात येत आहेत.

२) जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-०४-डीके-७३१७ व स्विफ्ट कार क्र. एमएच-०२ बीवाय-३२७७ हे शासनजमा करण्यात येत आहे. सदर प्रत्येकी वाहनाच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास वाहनांचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचे वाहने त्यांच्या मालकास परत करण्यात यावेत व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी वाहनांच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

३) अथवा वाहनांचे मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास दोन्ही वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचे वाहने लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food,

Civil Supply & Consumer Protection Dept. Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) ट्रक क्र. एमएच-०४-डीके-७३१७ चे चालक मोहंमद समीम मोहंमद सलीम सहा
२) राध्येशाम दिलीपकुमार यादव
३) अर्जुनकुमार ब्रिजलाल सरोज
४) पप्पु, ट्रकमधील हमाल
५) सुदन, ट्रकमधील हमाल
६) सुरेंद्रकुमार सुभेदार सिंग उर्फ बाबा
७) दिलीप शिवलाल ठक्कर
८) ट्रक क्र. एमएच-०४-डीके-७३१७ चे मालक
९) स्विफ्ट कार क्र. एमएच-०२-बीवाय-३२७७ चे मालक
१०) मे. सम्राट को-ऑप. कन्झ्युमर सोसायटी लि. चे अध्यक्ष

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामिण यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामिण यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) उपनियंत्रक शिधावाटप, ड परिमंडळ, अंधेरी यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, का.क्र. २, मागणी शाखा, प्रधान कार्यालय यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
५) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.
६) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

D:\user E\Amaldata-2012\Ammal Aadesh\Aadesh.doc

001